# अरुण कोलटकरांच्या कवितेची शैली

**वैजयंतीमाला जाधव**

सहाय्यक प्राध्यापक, मॉडर्न कॉलेज, पुणे - ५

प्रस्तुत लेखात अरुण कोलटकरांच्या कवितेचा रूपबंध आणि तिची भाषा यांचा अभ्यास केला जाणार आहे. कवितेच्या रुपामध्ये तिचा आशय, शब्द, पात्र, कथानक, विविध प्रतिमा, प्रतीके यांचा सामावेश होतो. त्यामुळे कवितेचा आशयात्मक, भाषिक आणि रूपात्मक अंगाने अभ्यास करणे गरजेचे असते. प्रस्तुत लेखात तिचा रूपकात्मक आणि भाषिक अंगाने वेध घेतला जाणार आहे.

कवितेच्या रुपाचा अभ्यास करणे म्हणजे त्या साहित्यकृतीचा आशय आणि त्यातील शब्दकळा, पात्ररचना, कथानक या साऱ्या घटकांच्या एकजिनसी संघटनेतूनच त्या साहित्यकृतीमध्ये आकाराला आलेल्या रूपबंधाचा अभ्यास करणे. याठिकाणी कोलटकरांच्या कवितेचा रूपबंध नेमक्या कोणत्या घटकाना घेऊन आकाराला आहे याची चर्चा केली आहे. कोलटकरांची कविता रुपबंधाच्या बाबतीत वैशिष्टयपूर्ण अशी आहे. तिने रचनेचे अनेक प्रकार आपल्या कवितेमध्ये हाताळलेले दिसतात. बोलीभाषेचा वापर, दीर्घात्मकता, निवेदनतंत्र, प्रसंगी निर्माण होणारी नादमयता आणि लयबद्धता, पदक्रमाची मोडतोड या साऱ्यांच्या एकत्रीकरणातून कोलटकरांची कविता आकाराला आलेली दिसते. प्रत्येक कवितेचा रूपबंध हा या आणि अशा अनेक घटकांच्या एकत्रिकरणातून आकार घेत असतो. कवितेचा रूपबंध हा त्याच्या त्याच्या प्रवृत्तीनुसार बदलत असतो. कवितेचा रूपबंध म्हणजे तिच्या संपूर्ण रूपाच्या; टोटल फॉर्म निर्मितीसाठी केलेली काव्यघटकांची संघटना होय आणि कवितेची ही संरचना, संघटना म्हणजे तिच्या अर्थाची संघटना असते. म्हणून सेंद्रिय रूपबंध हा साहित्यकृतीच्या अर्थामधून सहजपणे निर्माण होतो व त्या अर्थाला आपल्यात सामावून घेत असतो. कविता म्हणजे प्रतिमांचे केवळ संकलन नसते. फुलझाडावर उमललेली फुले ज्या नैसर्गिक नात्यानी एकमेकांशी बांधलेली असतात. त्याच आंतरिक व सेंद्रिय बंधनाने कवितेतील प्रतिमा व घटक एकमेकांशी बांधलेली असतात. सेंद्रिय रूपबंधाचा विशेष असा की तो साहित्यकृतीच्या अंगभूत गुणातून व तिच्या काव्यार्थ्यामधून सहजपणे संघटित व एकात्म झालेला असतो तो तिच्यावर बाहेरून लादलेला नसतो'' कवितेचा रूपबंध हा तिच्या आशय आणि अभिव्यक्तीच्या एकात्मतेतून आकाराला येतो. कवितेच्या रूपाचा विचार करता असताना मुख्यत्त्वे तिच्या रचना वैशिष्टयांचा अभ्यास करणे अपेक्षित असते. त्यामध्ये कवितेचा वाक्यबंध, प्रतिमा, नादबंध, छंद, लय, विरोधाभासात्मकता, अनेकार्थता यांचा समावेश होतो.

कोलटकरांची कविता ही रचनेचे अनेक प्रयोग करताना दिसते. तिची भाषा ही अत्यंत सूचक आहे. त्याची कविता ही आशयानुसार वेगवेगळया अभिव्यक्तिच्या पद्धतीचा अवलंब करताना दिसते. त्यांच्या म्हणजे अरूण कोलटकरांच्या कविता (१९७७) पहिल्या संग्रहातील कवितेची भाषा आणि रूपबंध आणि त्यानंतरच्या संग्रहातून आलेली कवितेची भाषा, तिचा रूपबंध यामध्ये अनेक परिवर्तने होत गेलेली दिसतात. विशेषत: पहिल्या संग्रहातील सुरवातीच्या काही कविता या अतिशय दुर्बोध असल्याचे जाणवते त्यातून व्यक्त होणारा आशय आणि तिचा भाषा ही समजण्यासाठी वाचकाकडे काही संकेतव्यूह असणे अपेक्षित असते. पण त्यानंतर येणाऱ्या चिरीमिरी, द्रोण, भिजकी वही इ. संग्रहातून व्यक्त होणारा आशय आणि तिचा रूपबंध समजून घेताना विशिष्ट अशा संकेतव्यूहाची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे कोलटकरांची कविता रचनाबंधाच्या बाबतीतही नंतरच्या टप्प्यात सरल होत गेलेली दिसते. कविता ही कवीची स्वत:ची व्यक्तिगत अभिव्यक्तिची एक रीत असते. कवीने त्याला अभिव्यक्त करताना शब्दांना काही एक आकार प्रदान केलेला असतो. हा आकार अर्थातच रुढार्थापेक्षा अतिशय वेगळा असतो. कोलटकरांचे दृश्यमाध्यमाशी असलेले जोडलेपण त्यांच्या कवितेतूनही तेवढयाच प्रभावीपणे जाणवते. कोलटकरांची कविता ही आधुनिकवादी जाणिवेतून लिहली गेलेली कविता आहे. त्यामुळे आधुनिकवादाच्या काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे प्रकटीकरण ही कविता करताना दिसते. तर्कनिष्ठ संरचनाना नकार देत ही कविता व्यक्तिगत अनुभवांचे प्रकटीकरण करत असताना प्रतीके आणि प्रतिमांवर भर देताना दिसते. आणि त्यामुळेच कवितेची एक नवी परिभाषा उदयाला येताना दिसते. कोलटकराच्या पहिल्या संग्रहामध्ये याचा प्रत्यय येतो.

अरुण कोलटकरांचा 'अरुण कोलटकरच्या कविता' हा पहिला कवितासंग्रह १९७७ साली प्रकाशित झाला.

महानगरीय संवेदन, अमानवीकरण, मृत्यूविषयक तीव्र जाणीव या आणि अशा अनेक जाणिवा या संग्रहातून व्यक्त झालेल्या दिसतात. भाषेच्या आणि रचनेच्या दृष्टीकोनातूनही या संग्रहातील कविता अतिशय वैविध्यपूर्ण आहेत. भाषेमध्ये अनुस्युत असलेली सूचितार्थता, संदिग्धता, अनेकार्थता अन्य साहित्यप्रकाराच्या तुलनेत कवितेमध्ये अधिक प्रभावीपणे जाणवते.

कोलटकरांच्या सुरवातीच्या कालखंडातील कवितामध्ये अतिवास्तववादी प्रतिमांची संख्या मोठया प्रमाणात दिसते. चित्रकलेच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरणाऱ्या अतिवास्तव कल्पना आणि प्रतिमा या कोलटकरांच्या कविता रचनेतील महत्त्वाचा घटक आहे. दोन निरनिराळया वास्तव आकारातून अतिवास्तव प्रतिमा निर्माण करणाऱ्या चित्रकाराप्रमाणे कोलटकर आपल्या कवितेतही अनेक अतिवास्तववादी प्रतिमांच्या माध्यमातून आशयाचे सूचन करतात. त्यामुळे हा नव्याने येणारा आशय रूढार्थापेक्षा वेगळा ठरतो. या संग्रहातील खूपशा कविता या अतिवास्तववादी रचनातंत्राच्या वळणाने जाताना दिसतात. त्यामध्ये घोडा, इराणी या कवितांचा प्रामुख्याने समावेश होतो. उदा. 'इराणी'

इराणचा चकणा शहा पाहतो तडकलेल्या व सस्मित
काचेआड केकला चढणारी क्रमिक बुरशी
क्वचित विचलित करते त्याचे लक्ष सुशिक्षित
बेकाराला राखी बांधताना अकृत्रिम माशी

(पृ.५६)

मानवी जाणिवेपलीकडील स्वप्नावस्थेतील विश्व या संपूर्ण कवितेत प्रकट होताना दिसेत. रूढ सामाजिक संकेतांची मोडतोड करून याठिकाणी नव्याने शब्दांची घडण झालेली दिसते. याठिकाणी काचेआडच्या केकला चढणारी बुरशी ही 'क्रमिक' आहे. आणि ती इराणचा शहा साध्या डोळयाने न पाहता चकण्या डोळयाने पाहत आहे. त्याचे बघणे चालू असताना एक 'अकृत्रिम माशी' सुशिक्षित अशा या बेकाराला राखी बांधते आहे. माशीचे अस्तित्व, तिचे हातावर बसणे यातून नैराश्याचा, उदासपणाचा एक अवकाश निर्माण झाला आहे. बेकाराला राखी बांधून जणू ती या सुशिक्षित बेकारालाच बेकारीपासून अभय देत आहे असा भास याठिकाणी निर्माण झाला आहे.

कोलटकरांच्या कवितेतील प्रतिमा या वेगवेगळया गटांशी संबंधित आहेत.त्या माणूस, पशुजगत, निसर्ग या सर्वाशी संबधित आहेत.येथे दृश्यसंवेदनाचा प्रत्यय देणाऱ्या प्रतिमांची संख्या मोठया प्रमाणात आढळते. त्यांच्या इराणी या कवितेमध्ये, हॉटेलमध्ये लावलेले निसर्गप्रतिबिंब ग्लासमधील पाण्यात पडल्यावर ग्लासच्या धक्का लागल्याने त्या निसर्ग चित्राचीही तारांबळ उडते. इथे वास्तव आणि अतिवास्तवाचं एकमेकात मिसळणं अधिक प्रभावीपणे व्यक्त झालं आहे. सिगारेट पेटवून झाल्यावर जळणरी काडी शेवटी विझताना जरा अधिक प्रज्वलित होते ते म्हणजे तिचे उठून बसणे आहे. संपूर्ण कवितेत ज्या अतिवास्तव प्रतिमा येतात त्या आशयाला अधिक गडद करताना दिसतात.

उदा.

माझ्या डोळयाच्या फसव्या झुडपातून
नरमांसभक्षक अश्रुंनी उडया घेतल्या
आणि तुझ्याभोवती गराडा घातला;

पृ. ३२

डोळयांचे फसवे झुडूप, नरमांसभक्षक अश्रू या शब्दांच्या साहचार्यातून अतिवास्तववादी चित्रांची आठवण होते. अश्रू आणि नरमांसभक्षक या शब्दसाहचार्यातून एक हिंस्त्रतेची जाणीव उत्पन्न होते. कोलटकरांच्या कवितेतील अतिवास्तववादी प्रतिमांची अनेक उदाहरणे जागोजागी दिसून येतात. कवी कवितेतून स्वत:च्या संवेदनाच्या अनुभूतीतूनच कवितेला समजून घेत असतो. अर्थातच या संवेदनाना शब्द रूपातच समजून घेता येते. त्यामुळे हे शब्द प्रतिमा, प्रतीकांच्या माध्यमातून काव्यविषयक संवेदनाना जागृत करतात. या प्रतिमा अनेकार्थीही असतात. या प्रतिमांच्या वेगवेगळया अर्थच्छटातून वाचक विशिष्ट अशा अर्थापर्यंत पोहोचतो. कोलटकरांची कविता ही आधुनिकवादी जाणिवेतून लिहली गेलेली आहे.

कोलटकरांच्या कवितेवर दृश्यात्मकतेचा एक महत्त्वाचा एक ठसा उमटलेला आहे. शब्दांच्या विशिष्ट अशा रचनेतून वाचकासमोर दृश्यप्रतिमा उभी करण्याचे त्यांचे कौशल्य या संग्रहातील अनेक कवितांमधून प्रत्ययाला येते. ''अनेक शॉटसची आणि ध्वनींची अखंडितपणे प्रक्षेपित होणारी मालिका म्हणजे चित्रपट'' ही व्याख्या मान्य केल्यास कोलटकरांच्या कवितेतील दृश्यात्मकतेचे चित्रपटातील दृश्यात्मकतेशी काही नाते सांगता येईल. शॉट म्हणजे एक शब्द नव्हे तर ते एक संपूर्ण वाक्य असते. अशी अनेक वाक्ये अंतर्गत संगतीने जुळवलेली असतात. त्या जुळणीमागे त्या त्या चित्रपटकाराचे अगर त्या त्या चित्रपटाचे काही एक व्याकरण अगर तर्कशास्त्र असते.'' वेगवेगळया अवकाशातील घटनांना कोलटकर आपल्या कवितेतून मूर्त स्वरूप देतात.

उदा.

खडकामधला सार्वभौम घनतेचा
अनावर अश्व खिंकाळतो
जसा शून्याचा स्वार
हाणतो लोखंडी टाच
अद्वातद्वा धावतो
खडकांच्या धमन्यातून

(पृ.२८)

याठिकाणी वेगवेगळया शॉटस्चे एक संकलन केले आहे असे वाटते. खडकामधील सार्वभौम घनतेचा अश्व, लोखंडी टाच, खडकांच्या धमन्या इ. प्रतिमांनी याठिकाणी गतिमान असा एक चित्रपटांचा ठसा उमटवला आहे असे वाटते. या प्रतिमा वाचकासमोर दृश्यात्मकतेच्या शक्यताही तेवढयाच ताकदीने उभ्या करतात.पण त्यामध्ये अंतर्भूत असलेले शॉ टस नेमके कोणते असतील याबद्दल वाचकाला आधीच काही सांगता येत नाही. 'इमारत' या कवितेची संपूर्ण रचना दृश्यात्मकतेचा ठसा वाचकाच्या मनावर उमटवते.

**१. वर्णनात्मक व कथनपर कविता :-**

कोलटकरांच्या एकूण कवितांचा विचार करता त्यांच्या कवितेमध्ये वर्णनात्मक आणि कथनपर कवितांची संख्या जास्त प्रमाणात आहे. त्यांच्या 'अरुण कोलटकरच्या कविता' या संग्रहानंतर आलेल्या 'चिरीमिरी', 'भिजकी वही', 'द्रोण','अरुण कोलटकरच्या चार कविता' यामधील कवितामध्ये कथनपरतेचा अधिक विकास झालेला आढळतो.

कोलटकरांच्या पहिल्या कवितासग्रहातील इराणी, थेरडी, श्रीज्ञानेश्वरसमाधी वर्णन, बिल्डिंगा, रोज तो बसने येता जाता या कवितांमध्येही ही वर्णनपरता अधिक्याने जाणवते. श्री ज्ञानेश्वरसमाधी वर्णन या कवितेमध्ये ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर कवीच्या मनावर झालेल्या परिणामाचे हे वर्णन आहे. या वर्णनासाठी कवीने 'अभंग' हा छंदप्रकार वापरलेला आहे. क्रियापदानी या कवितेची सुरवात झालेली आहे. संपूर्ण कवितारचनेत एक कमालीचा प्रवाहीपणा आढळून येतो. नारद, तुंबर, वैष्णव, चंद्रबिंब, मृदंग, टाळ, हार, पाकळी, निर्माल्य या प्रकारच्या शब्द योजनेमुळे कवितेमध्ये एकजिनसी वातावरणाची निर्मिती करून ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे कार्य यांचा शोकात्म परिणाम विविध चेतन अचेतन घटकांवर आरोपित करून कोलटकर या समाधीचे वर्णन करून आपली भावात्मकता पाश्वभागी ठेवतात. कोलटकरांच्या या कवितेमध्ये साडेसातशे वर्षापूर्वी घडलेल्या घटनेच्या परिणामाचे वर्णन कवीने नुकत्याच घडून गेलेल्या एखाद्या प्रसंगाप्रमाणे केले आहे. त्यांच्या वर्णनात्मक कवितांमध्ये 'इराणी' ही देखील एक महत्त्वाची अशी कविता आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंड, त्यामध्ये उदयाला आलेली महानगरे, या महानगरातून वेगाने वाढणाऱ्या सुशिक्षित बेकारांची संख्या या साऱ्याचा एक आलेखच या कवितेमधून प्रत्ययाला येतो. त्यांची कविता घटनेचे केवळ वस्तुनिष्ठ वर्णन करत नाही तर त्या घटनेच्या पा९र्वभूमीवर योग्य अशा वातावरणाची निर्मितीही ती करते.

**२. नाटयात्मकता आणि बोलीभाषेचा वापर :-**

कोलटकरांच्या बहुसंख्य कवितामध्ये बोलीभाषेचा वापर झालेला दिसतो. त्यांच्या अरुण कोलटकरच्या चार कविता या शेवटच्या संग्रहापर्यंत बोलीभाषेचा वापर अधिक्याने केलेला जाणवतो. 'अरुण कोलटकरच्या कविता' या संग्रहामध्ये 'मैं मॅनेजरको बोला','न्यू येर डे','अन्न','मुंबईने भिकेला लावलं' 'काय डेंजर वारा सुटलाय', 'चक्की', 'रददी', 'खेकडे', 'बिल्डिंगा', 'पायाळू इमारत', 'हॉस्पिटलच्या कविता' याचा सामावेश होतो. बोलीभाषेचा वापर असलेल्या या कवितांमध्ये प्रसंगपरत्वे नाटयात्मकता आलेली दिसून येते.

उदा.

चक्की ही कविता.
बाई ग तू कोणीही अस
भटीण घाटीण किरिस्ताव
इथं नाही भेदभाव
पदर खोच
अन् मुकाटयानं घर गाठ
तू म्हातारी की तरणी
ते पण ही गिरणी
विचारणार नाही;

(पृ.८०)

या कवितेतून बोलीभाषेचा सामर्थ्याने उपयोग करून कवी कथित घटनेला अधिक टोकदार करत आहे. काही ठ्रिकाणी ग्राम्य शब्दांचाही वापर कवितेत केलेला दिसतो. पण त्यामध्येही एक सहजता आढळते. बंबैया हिंदीत लिहलेल्या काही कवितांमध्येही सरळसरळ संवादाचाच उपयोग केलेला दिसतो. यामुळे कवितेच्या पारंपारिक रूपाला कवीने फाटा दिला आहे हे लक्षात येते. मैं मॅनेजरको बोला, न्यू येर डे यासारख्या कविता या भाषेच्या आणि रूपबंधाच्या दृष्टीने अंत्यत प्रयोगशील अशा आहे. प्रसंगी संवादाचा वापर केल्याने यामध्ये नाटयात्मकता आलेली दिसते.

उदा.

जन्मजात इमारत ही कविता.
''पायाळू इमारतीनं मला विचारलं,
''आमचा पाय का धरला ?''
मी म्हणालो,''आमच्या
अंगणात का आला?''
म्हणते कशी,''तुमचं
अंगण केवढे? ''
अगं टवळे
माहित आहे मला ते सगळं'';

(पृ.१४)

बोलीभाषेचा, संवादाचा उपयोग कवितेत केल्यामुळे कवितेच्या रूपाच्या शक्यता अधिकाधिक विस्तारल्या गेलेल्या आहेत. पारंपारिक रूपबंधापेक्षा प्रस्तुत कवितेमधील रूपबंध कवितेचा अवकाश अधिक विस्तारताना दिसतोध अशा प्रकारच्या रूपबंधामध्ये 'मी.तू' या संबोधनाचा उपयोगही केलेला आहे.

**३. 'चिरीमिरी' या कवितासंग्रहातील कवितेचा रूपबंध व भाषा :-**

कोलटकरांचा 'चिरीमिरी' हा काव्यसंग्रह जाने. २००३ मध्ये प्रकाशित झाला. 'अरुण कोलटकरच्या कविता' या त्यांच्या पहिल्या संग्रहातील कवितेचा रूपबंध व भाषा यांचा विचार केल्यावर एक गोष्ट लक्षात आली की या संग्रहातील कविता समजून घेण्यासाठी विशिष्ट अशा संकेतव्यूहाची जाण वाचकाला असणे गरजेचे असते. त्यामुळे यातील कविता दुर्बोधतेकडे वळल्या आहेत. जाहिरात, चित्रकला, डॉ क्युमेंटरी अशा वेगवेगळया माध्यमांचा प्रभाव या संग्रहातील कवितांवर असलेला जाणवतो. त्यामुळे दृश्यात्मकतेचा एक महत्त्वाचा ठसा या कवितांवर उमटला आहे. दैनंदिन व्यवहारातील बोलीभाषेचा वापर करत, संवादात्मक पद्धतीने काही कवितांची रचना त्यांच्या कवितेत झालेली आहे. प्रस्तुत संग्रहातील कवितेचा रूपबंध हा मात्र या पहिल्या संग्रहातील कवितांपेक्षा खूपसा वेगळा आहे. या संग्रहातील जवळजवळ सर्वच कविता या अभंग रचनाप्रकारामध्ये बांधलेल्या दिसतात. तुकारामाचे अभंग जसे चार पाच च्या गटामध्ये आहेत तसे या कवितांचेही चार पाच गट आहेत. ज्यामध्ये एकच सूत्र आहे.

**४. अभंग या रचनाप्रकारातील कविता :**

चिरीमिरी संग्रहातील कवितांच्या बांधणीसाठी कोलटकरांनी मुख्यत्वे अंभग हा रचनाप्रकार हाताळलेला दिसतो. एखाद्या मुख्य विषयाभोवती चार ते पाच कवितांचा एक गट याप्रमाणे या कवितांचीा रचना झाली आहे. 'रूपावरच्या अभंगाने' या कवितांची सुरुवात झालेली. बळवंतबुवाची वेश्यांसह पंढरपूरला वारी हे या रचनामागचे एक महत्त्वाचे सूत्र आहे. या कवितांमध्ये रचनेचा एक सहजपणा आढळतो. कधी दोन ओळीचे तर कधी चार ओळींचे कडवे अशी या कवितांची रचना आहे.'रूपावरचा अभंग','नगेली','नंदाचा वढा','भेट','फुगडी', 'विटेवरची फुगडी','फोटो',धोंगडी', 'मौत का कुँवा', जोहार, प्रश्न, कुलाब्याची फेरी, अनाजी फदालेस विनंती, 'कोंबडा', 'घोडा', 'यल्लू', 'अत्तर', देवरूस', रूपाया', कोहळा', सामान', वीणा', 'गजरा', कायदा, गीताबाईचे अभंग', खुरची', 'ब्रम्हचर्य', 'बॉल बॉल बॉल', 'रोग', 'चिरीमिरी' या कवितांची रचना ही दोन ओळीचे एक कडवे याप्रमाणे झाली आहे. या दोन ओळीच्या रचनेमध्ये अतिशय सहजपणे यमक जुळलेले दिसते यामध्ये कोणतीही जाणीवपूर्वकता दिसून येत नाही.

कोलटकरांच्या या संग्रहातील कवितांचे आणखी एक वेगळेपण सांगता येते ते म्हणजे एकाच शीर्षकाखाली कवितेचे वेगवेगळे भाग केलेले दिसतात. रचनेच्या दृष्टीने जरी हे दोन भाग असले तरी यामध्ये आशयाचा एकच एक धागा पकडून त्याचा विकास केलेला आहे. 'कोंबडा', 'अत्तर', 'देवरूस', 'गीताबाईचे अंभग', 'बॉल, बॉल, बॉल', या कवितांमधील वेगवेगळया भागामध्ये निवेदकही बदलतो आहे. कोलटकरांच्या या सर्वच कविता निवेदकाने वेगवेगळया वेळी केलेलया कथनावरती आधारीत आहे. 'देवरूस' या कवितेत तीन भाग आहेत पहिल्या भागात सखू आपल्याकडे गिऱ्हाईक येत नाही म्हणून निवेदन करते आहे. दुसऱ्या भागात बुवा या सखूकडे गिऱ्हाईक यावे म्हणून तिला काही उपाय सांगत आहे. तर तिसरा भाग निवेदकाने अतिशय तटस्थ राहून कथन केला आहे. रचनाबंधाच्या दृष्टीने पाहता अनेक ठिकाणी कवितेने वेगळे वळण घेतेलेले दिसते. संपूर्ण कवितेत निवेदक मात्र बदलताना दिसतो. पण निवेदनाची भाषा त्यामध्ये असणारा एक उपरोध मात्र तोच आहे. यामध्ये कोणताच फरक जाणवत नाही.

**५. कोलटकरांच्या कवितेतील कथनात्मकता :-**

कोलटकरांच्या या कवितासंग्रहातील कवितांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याना कथनात्मतेची एक महत्त्वाची चौकट आहे असे लक्षात येते. बळवंतबुवा एकशेसात वेश्यांना घेउन पंढरपूरला जातो हे सूत्र एका कथनाच्या चौकटीत याठिकाणी सांगितले आहे. याठिकाणी निवेदकाने एक कथाविश्व उभे

केले आहे. याकडे त्याने वेगवेगळया दृष्टीकोनातून पाहिले आहे. हा निवेदक कधी त्या कथाघटकाचा एक भाग बनून घडणाऱ्या घटनेचे निवेदन करत आहे तर कधी कथागत विश्वाकडे अतिशय तटस्थपणे पाहत आहे. यामध्ये विशिष्ट अशा आशयसूत्रामध्ये सर्वच कविता गुंफल्या गेलेल्या आहेत. कथात्मक साहित्याप्रमाणे कथन/निवेदन हे या कवितांचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सांगता येते. कथात्मक साहित्याची अनेक महत्त्वाची लक्षणे त्यांच्या या कविता प्रकट करतात. पण लयीचाही एक घटक यामध्ये कार्यरत आहे. आणि त्यामुळे या कविता केवळ गद्याश्रयी न होता त्या पद्यात्मकच आहेत.

कथात्मक साहित्यातील कथानक, आशयसूत्र, वातावरण, निवेदन, भाषा हे या साऱ्या घटकांचा अंतर्भाव 'चिरीमिरी' मधल्या कवितांमध्ये होतो. कोलटकरांच्या कवितांच्या रूपबंधाचा एक महत्वाचा विशेष म्हणजे मौखिक परंपरेतील कथारूपांची एक विशिष्ट लय या सर्वच कवितामंधून दिसते. त्यांच्या यापूर्वीच्या संग्रहातील 'घाल नायलॉनचं कार्सेट मर्दा' 'खेकडे','भूपाळी','तक्ता' या कवितामधून या मौखिक परंपरेतील ही लय जोपासली गेलेली दिसते. एखादा विनोद सांगावा किंवा एखादी कहाणी सांगावी अशा तऱ्हेने या कवितांची रचना झालेली दिसते. या संग्रहात येणारा निवेदक हा बळवंतबुवाच्या माध्यमातून कवितांमध्ये येणाऱ्या वेगवेगळया पात्रासंबधी वेगवेगळया अंगाने भाष्य करतो आहे. त्यामुळे वाचकाच्या मनात या पात्रांच्या कृती, त्यांच्या उक्ती यावरून त्या पात्रासंबधी एक प्रतिमा निर्माण होते. बळवंतबुवा, त्याच्या विविध हरकती त्याच्या सोबतच्या वेश्या या सर्वाच्या मिश्रणातून याठिकाणी एक नाटय उभे राहते.

नाटक व कथनात्मक साहित्यप्रकारातील काही रचनांचे बंध या कवितांशी त्यांनी स्पष्टपणे जोडलेले दिसत आहे.

अहो फोटोग्राफर अहो फोटोग्राफर
माझा फोटो काढा विठ्ठल रखमाईबरोबर
अगं रखमाई जरा बाजूला सर
तुम्हा दोघांमध्ये मला जागा कर ;

(पृ.२६)

यासारख्या कवितेतील ओळी थेट संवाद साधतात. 'अहो फोटोग्राफर या शब्दाच्या द्विरूक्तितून याठिकाणी लय साधली गेली आहे. संपूर्ण कवितेमध्ये यमक रचना अत्यंत नैसर्गिकपणे योजलेली आहे. शब्दांचा अचूक वापर करत कोलटकर कवितेचा आशय वाचकापर्यंत पोहचवतात. या संग्रहातील कवितापर्यंत कोलटकराची कविता घाटाविषयी अधिक सजग झालेले दिसतात. याच कवितेतील काही कवितेच्या ओळीवरून त्यांचे शब्दवापराचे अचूकपण ध्यानात येते.

''अहो फोटोग्राफर फोटोत कुंचल्याने भरा रंग
माझी साडी चोळी निळी निळे विठ्ठलाचे अंग ;

(पृ.२६) कोलटकरांच्या कवितेतील ठिकठिकाणी येणारी शब्दकळा ही अतिशय वैविध्यपूर्ण आहे. कोलटकर आपल्या कवितेतून वेगवेगळया शब्दांचे अतिशय तोलून-मापून उपयोजन करतात. त्यांच्या कवितेतील शब्दकळा ही खूपदा अनेकार्थतेचा प्रत्यय देते. विठ्ठलाला महाराची लेकरे भेटायला येणार म्हटल्यावर 'चार्सोवीस' शास्त्री त्याला रातोरात तिथून हलवतात. याठिकाणी 'चार्सोवीस' हा शब्द दूयर्थी उपयोजिला आहे. चारशे वीस शास्त्री आणि अतिशय चतुर शास्त्री अशा दोन्ही अर्थाचे प्रकटीकरण या शब्दातून होते. कोलटकरांच्या कवितेची शब्दकळा, उपरोध आणि उपहासयुक्त अशी आहे. या संग्रहातील कवितांच्या रूपाबाबत आणखी एक विशेष लक्षात घ्यावासा वाटतो तो म्हणजे या संग्रहातील कविताची रचना उद्येशिकेच्या स्वरूपात झाली आहे.

**६.'द्रोण' या कवितासंग्रहातील कवितेचा रूपबंध :-**

अरुण कोलटकरांचा 'द्रोण' हा कवितासंग्रह इ.स.२००४ मध्ये रीतसर प्रकाशित झाला. इ.स. २००३ मध्ये ही कविता खाजगी वितरणासाठी छापली गेली होती. प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यासाच्या सोयीसाठी प्रकाशन कालखंडानुसार कवितासंग्रहाचा अभ्यास केला आहे. 'द्रोण' या संग्रहातील कवितेचा रूपबंध हा आधीच्या तीनही कवितासंग्रहापेक्षा वेगळा आहे. कवीने कवितांच्या सुरवातीलाच याला 'सर्ग' असे संबोधले आहे.

उदा. 'हे सर्ग वाल्मिकी रामायणाच्या कोणत्याही पाठात आढळत नाहीत.'

प्रस्तुत कवितासंग्रहातील कविताची एकूण पाच भागात रचना केली गेली आहे. आणि या पाच भागात वेगवेगळ्याा सूत्रानुसार कवितेची रचना केलेली आढळते. रामकथेवर आधारीत अशी ही दीर्घकविता वाचकाला प्राचीन कालखंडात नेतेच, पण समकाळाशी तिचे जोडलेपण तितक्याच प्रकर्षाने जाणवते. प्रस्तुत कवितेमध्ये रामायणातील रामविजयाच्या तथाकथित प्रसंगाला हाताशी घेऊन पुन्हा नव्याने त्याची जुळणी करण्याचा प्रयत्न कोलटकरांची कविता करते. 'द्रोणचा संपूर्ण बाज हा कथात्म कवितेचा आहे. एकूण पाच सर्गाची योजना असणारा, कवितेमध्ये वापरलेला निवेदनाचा

हा रुपबंध आधीच्या कवितांपेक्षा त्यांचे वेगळेपण स्पष्ट करतो. रुपबंधाच्या दृष्टीने त्यांच्या कवितेतील वेगळेपण पुढीलप्रमाणे सांगता येते.

१. निवेदनात्मकता
२. नाट्याात्म प्रसंगनिर्मिती
३. निखळबोलीभाषेचा वापर
४. प्रत्ययकारी वातावरणनिर्मिती
५. बंदिस्त काव्यरचना इ.

रुपबंधाच्या दृष्टीकोनातून विचार करता 'द्रोण' ही दीर्घ स्वरूपाची कथात्म कविताच म्हणता येईल. प्राचीन महाकाव्याच्या धर्तीवर, द्रोणमध्ये केलेली वेगवेगळी सर्गाची रचना, प्रत्येक सर्गामध्ये वेगवेगळ्याा पण एकाच धाग्याने जोडलेला कथाभाग, प्रसंगी अद्‌भुताचा केलेला वापर या साऱ्यामुळे कवितेचा आकृतिबंध अधिकच चिरेबंद झाला आहे. व भावकवितेच्या वळणापेक्षा 'द्रोण' मधील कविता सर्वस्वी निराळी आहे. तिच्यामधील गद्यात्मक फॅंटसीचा वापर, प्रभावी व्यक्तिचित्रण, नाट्याात्म प्रसंगनिर्मिती यामुळें ती अधिक प्रयोगशील बनली आहे.एका काळामध्ये घडून गेलेल्या  घटनेचे दुसऱ्या काळामध्ये वर्णन करताना(राम विजयाच्या प्रसंगाचे आधुनिक काळामध्ये)  त्यात कवीने जो तोल सांभाळला आहे तो नोंद करण्यासारखा आहे. या तोलामुळे या संग्रहातील कोणतीही व्यक्तिरेखा, किंवा प्रसंग उपरा वाटत नाही. वानर आणि माणूस यांच्या भावजीवनातील सूक्ष्म फरक, वर्तमानकालीन माणसाचे भौतिक जगणे या साऱ्याला कोलटकरांची कविता अतिशय सूक्ष्मपणे अधोरेखित करते. पारंपारिक वाङ्मयाच्या इतिहासामध्ये आलेल्या 'रामा'च्या व्यक्तिरेखेला कोलटकर मात्र याठिकाणी वेगळे वळण देतात. रामाराज्यातील चातुवर्ण्यव्यवस्थेची पद्धत, सीतेला शुद्ध असण्याचे अग्निने दिलेले  प्रमाणपत्र, माणसाचे इतर जनावराचे दूध पिण्यामागची कारणमीमांसा हे सारे अतिशय उपरोधिकपणे कोलटकर मांडतात.

केवळ कथा सांगून याठिकाणी ते थांबत नाहीत तर त्यातील मर्यादाही ते उघड्याा करतात. कोलटकरांच्या प्रस्तुत कवितेचा रुपबंध हा त्यांच्या इतर चारही कवितसंग्रहामधून येणाऱ्या कवितेपेक्षा अतिशय भिन्न स्वरूपाचा आहे आणि त्यामुळेच तो अतिशय महत्त्वाचा वाटतो.

### ७. भिजकी वही या कवितासंग्रहातील कवितेचा रुपबंध :

अरुण कोलटकरांचा 'भिजकी वही' हा कवितासंग्रह २००३ मध्ये प्रकाशित झाला. एकूण ३९३ पृष्ठांचा हा संग्रह असून त्यामध्ये पंचवीस कवितांचा समावेश आहे. यापूर्वीच्या त्यांच्या संग्रहातील कविता आणि 'भिजकी वही' मधील कविता यामध्ये  रुपबंधाच्या दृष्टीने फरक होत गेलेला दिसतो. 'भिजकी वही' मधील 'डोहाळगाणं' 'पो-च्यु-ई', 'किंकाळी', 'दृष्टमध','शेवटचा अश्रू' या पाच कविता वगळता इतर वीस कविता या माला कविता आहेत. एका कवितेच्या शीर्षकाखाली चार ते पाच कवितांपासून बारा कवितापर्यंत अशा उपकवितांचा समावेश झालेला दिसतो. या उपकवितांमध्ये परस्पर असे एक जैविक नाते असलेले दिसते. कोलटकरांच्या यापूर्वीच्या कवितांपेक्षा या संग्रहातील कवितांचे स्वरुप खूपसे वेगळे आहे. आशयाच्या अंगाने विचार करता त्या वेगळया आहेतच पण रुपबंधाच्या दृष्टीकोनातून विचार करता त्या दीर्घ होत गेलेल्या दिसतात. 'भिजकी वही' मधील कविता एकूणच विश्वाला कवेत घेऊन मानवजातीविषयी भाष्य करु पाहत आहे. या संग्रहातील कविता वेगवेगळया काळात घडून गेलेल्या घटनांचे कथन करतात. त्या कथनात्म स्वरुपाच्या आहेत. या घटना ग्रीकांच्या इसवीसन पूर्वीही घडलेल्या आहेत. काही ऋग्वेदातील आहेत. तर काही येशू ख्रिस्ताच्या जीवनचरित्राशी निगडित आहेत. रशियातील स्टॅलिनशही, व्हिएतनामचे युद्ध, खांडवहनाचे दहन, त्यामुळे घडलेले सर्पसत्र या साऱ्या घटनांचे कथन त्यांची कविता करते. प्रंसगी यामधील अनेक कथांची पुनर्निर्मिती कवी करतो.

### ८.अरुण कोलटकरच्या चार कविता या कवितेचा रूपबंध

अरुण कोलटकरांचा हा पाचवा कवितासंग्रह इ.स.२००६ मध्ये प्रसिद्ध झाला. भिजकी वही तयार होत असतानाच यातील कवितांची रचना झालेली दिसते. परंतु 'भिजकी वही' मध्ये त्या बसत नसल्याने त्या या संग्रहाच्या रूपाने प्रसिद्ध झाल्या. या संग्रहामध्ये एकूण चार कविता आहेत. 'जेरूसलेम','पॅरिस' या शहरांवरच्या दोन कविता आणि 'अस्मिता' आणि 'परंपरा' या मानवी मूल्यांशी संबधित दोन कविता यामध्ये समाविष्ट केल्या आहेत.

या संग्रहातील कवितांचा रूपबंध हा 'भिजकी वही' मधील कवितांच्याप्रमाणेच आहे. दीर्घस्वरुपाची रचना, कथनात्मकता, निवेदनाचा वापर या रुपवैशिष्टयांचा आधारे या कवितांची रचना झाली आहे. यामधील पहिलीच कविता जेरूसलेम वर आहे. जेरूसलेम ही प्रेषितांची भूमी समजली जाते आणि याठिकाणी भविष्यात काय काय होईल याचे सूचन कवी करतो. येथे भविष्यात संहार होईल असे भाकित निवेदक करतो. आणि  हे वेगवेगळया पद्धतीने याठिकाणी सांगितेले आहे.

उदा.

'एक वेळ अशी येईल
की ज्याला ज्याला म्हणून शक्य असेल
तो जाईल धडपडत
चालत खुरडत सरपटत
जमेल तस (पृ.१५)

निवेदक भविष्यात घडू पाहणा-या घटनांचा एक आलेखच वाचकासमोर मांडतो. याठिकाणी शब्दाचे उपयोजन अतिशय सूक्ष्मपणे केलेले दिसते. दफनभूमीकडे जाण्याच्या वेगवेगळया तऱ्हा याठिकाणी स्पष्ट केल्या आहेत. धडपडत, खुरडत, सरपटत अशा पद्धतीने का असेना पण प्रत्येकजण त्याच्या शेवटच्या बिंदूकडे मार्गक्रमण करेल असे याठिकाणी सूचित केले आहे.

कोलटकरांच्या या संग्रहातील कवितांची रचना श्रोता केंद्रवर्ती ठेवून झालेली दिसते. प्रत्येक ठिकाणी समोरच्या व्यक्तीला आपण काही तरी सांगतो आहोत अशा अविर्भात निवेदक निवेदन करतो आहे.

उदा.

अस्मितेला दिवस गेलेत
असं
ऐकलं मी
काय सांगताय
आणि कुणापासनं ? आरशांपासन ?
काय माहित (पृ. ३५)

याठिकाणी निवेदकाने जे ऐकलं त्याला प्रतिप्रश्नही केलेला आहे. पण सहजच्या व्यवहारात वापरल्या जाणा-या बोलीभाषेच्या द्वारे निवेदक कथन करतो.याठिकाणी कथन करणारा निवेदक नेमका कोण आहे हे स्पष्ट होत नाही.

**समारोप**

कोलटकरांच्या कवितेच्या रूपबंधाचा अभ्यास करत असताना एक निरीक्षण येथे नोंदवणे महत्त्वाचे वाटते. ते म्हणजे त्यांच्या सुरूवातीच्या कविता आणि नंतरच्या टप्प्यातील कविता यामध्ये खूप परिवर्तने होत गेलेली दिसतात. अतिवास्तववादी रचनातंत्र, प्रतिमा-प्रतीकांचे उपयोजन त्यांच्या नंतरच्या काव्यलेखात प्रभाविपणे दिसत नाही. त्यांच्या नंतरच्या कवितेत काव्यलेखनात दिसून येत नाही. पण एकूणच आपल्या कविता प्रवासामध्ये त्यांनी कविता रचनेचे अनेक प्रकार हाताळले. कवितेच्या अर्थाची संघटना करत असताना जो रूपबंध कवीने हाताळला आहे, तो कवितेला स्वत:चा एक चेहरा प्राप्त करून देतो. विविध आशयानुसार अभिव्यक्तिच्या वेगवेगळया पद्धतींचा अवलंब त्यांची कविता करते. सुरूवातीची दुर्बोध वाटणारी त्यांची कविता नंतरच्या टप्प्यात सरल झालेली दिसते. कधी कवितेमधून ती नाटयात्मकता आणि बोलीभाषेचा वापर करते. काही ठिकाणी ही कविता तटस्थपणे तर कधी स्वगताच्या रूपात वाचकांशी संवाद साधते. या कवितेत कवी कधी श्रोत्याला गृहित धरत कथन करत आहे. तर कधी समोर कुणीच नाही असे समजून त्याचे बोलणे चालू आहे. एकूणच मराठी कवितेचा इतिहास पाहता अशा स्वरूपाची काव्यरचना खूपच कमी प्रमाणात आढळते.

कोलटकरांची कविता रूपबंधाच्या बाबतीत सतत दक्ष राहिलेली आहे. कोणताही शब्द कवितेत वापरताना तो अगदी त्याच ठिकाणी तंतोतंत बसला पाहिजे याची कवीने काळजी घेतली आहे. या कवितेमध्ये कोलटकर शब्दांच्या माध्यमातून विविध दृश्ये उभी करतात. त्यामुळे शब्दांच्या माध्यमातून वाचकाला रंग रेषांचा प्रत्यय सहजपणे येतो. त्यांच्या खूपशा कविता या दृश्यप्रतिमांची अखंड साखळीच उभी करतात. हा त्यांच्या कवितेच्या रूपबंधांचे वेगळेपण आहे.

कोलटकरांच्या पाचही कवितासंग्रहातील रूपबंध वैविध्यपूर्ण आहे. कवितेतील आशयाची परिणामकारकता वाढवण्यासाठी अनेकदा कवितेतील रूपबंध साह्याभूत ठरतो. साठोत्तरी कवितेमध्ये रूपबंधाच्या अनुषंगाने कोलटकरांच्या कवितेने महत्त्वाची भर घातलेली दिसून येते.